महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

तात्काळ/कालमर्यादा

क्रमांक:पोमसं/५/१०/ससे-पोउपनि (मुख्य) परीक्षा-२०२४/१०२/२०२५ मुंबई, दिनांक- ०३ /११/२०२६

संदर्भ :- १. या कार्यालयाचा समक्रमांकित ज्ञाप, दि.२१/०८/२०२६ व दि.१०/०९/२०२६
२. संचालक मपोअ, नाशिक यांचे क्र.मपोअ/प्रशि-१/ससे(पोउपनि)/(मुख्य)/परीक्षा-२०२४/सत्र क्र.१३०/७९२४/२०२६, दि.२८/१०/२०२६.

विषय :- **पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०२४, तसेच महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ अंतर्गत प्रतिक्षायादीमधील उमेदवारांना पोलीस उप निरीक्षक पदाचे मुलभूत प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे पाठविण्याबाबत.**

*****

उपरोक्त विषयान्वये खालील नमूद सर्व संबंधित घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०१ अन्वये पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२४ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेले पुरुष व महिला असे एकूण १७७ आणि पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०२४ मधील प्रतिक्षा यादीतील ०२ उमेदवार तसेच परीक्षा-२०२२ अंतर्गत प्रतिक्षायादीतील ५ उमेदवार असे एकूण १८४ उमेदवारांचे महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे सरळसेवा नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक पदाचे मुलभूत प्रशिक्षण **दि.१७/११/२०२६** रोजी पासुन सुरु होत असल्याचे कळविले आहे.

२. तरी, संबंधित सर्व घटकप्रमुखांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.०१ च्या ज्ञापनासोबत जोडलेल्या यादीतील उमेदवारांचे पोलीस उप निरीक्षक पदाचे मुलभूत प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे **सत्र क्र १३० (सरळसेवा), दि.१७/११/२०२६, वार मंगळवार** पासून सुरु होत असल्यामुळे सदर उमेदवारांना दि.१७/११/२०२६ रोजी **सकाळी ०९.००** वाजेपर्यंत तेथे हजर राहण्याबाबत सूचना द्याव्यात.

३. सरळसेवा पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र.१३० मधून प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांकरीता संचालक महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना महाराष्ट्र पोलीस विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. त्याबाबत सत्र क्र.१३० मधील सर्व उमेदवार व संबंधीत घटक प्रमुखांनी याची नोंद घ्यावी. तसेच, या कार्यालयाचे संदर्भाधिन दि.२१/०८/२०२६ मधील ज्ञापनामध्ये दिलेल्या सूचनांचे अनुषंगाने पुढील योग्य व आवश्यक ती कार्यवाही करावी.

(सुप्रिया पाटील यादव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)

SCAN AnyScanner

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग वगळून)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग वगळून)

प्रत माहितीस्तव-

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
[लक्षवेध :- **श्री.शैलेश सुर्वे, कक्ष अधिकारी, पोल-५-अ,** गृह विभाग]

प्रत योग्य व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता,

प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. यांनी सदरच्या मार्गदर्शक सूचना "पोलीस उप निरीक्षक पदाच्या प्रशिक्षणास हजर राहणाऱ्या सत्र क्र. १३० मधील उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना" व इंग्रजीमध्ये "Guidline to the Candidates of PSI Batch No.१३०" या शिर्षाखाली २ (दोन) महिन्यांकरीता प्रस्तृत करावे.

SCAN AnyScanner

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक ०२२-२८१०२२२ Email ID - trg.directorate@mahapolice.gov.in

---

क्र.अपोमसं/प्रशि-४/मुख्य परीक्षा-२०२४/१९१३ मुंबई, दि. २८/१०/२०२६

प्रति,

मा. पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

(लक्षवेध - कार्यासन अधिकारी का.क्र.०५)

विषय :- पोलीस उप निरक्षक (मुख्य) परीक्षा-२०२४ बाबत.

*****

उपरोक्त विषयास अनुसरुन संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांचे जा.क्र.मपोअ/प्रशि-१/ससे (पोउपनि)/(मुख्य) परीक्षा-२०२४/सत्र क्र.१३०/७९२४/२०२६ दि.२८/१०/२०२६ रोजीच्या पत्राची प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी या सोबत जोडली आहे.

(प्रविण पुजारे)
कार्यालय अधीक्षक,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रत माहितीस्तव सादर,
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक,
महाराष्ट्रपोलीसअॅकॅडमी,नाशिकयांचेकार्यालय,
त्र्यंबकरोड,नाशिक-422007.
☎(0253)2352161.
director.mpa.nashik@mahapolice.gov.in

क्रमांक : मपोअ/प्रशि-1/ससे (पोउपनि)/(मुख्य) परीक्षा-2024/सत्र क्र.130/7924/2026 नाशिक, **दिनांक** : 28 OCT 2026

अतिमहत्त्वाचे /तातडीचे

प्रति,

मा.पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत मार्फतीने

मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संदर्भ : पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र जा.क्र. पोमसं/5/10/ससे-पोउपनि(मुख्य) परीक्षा-2024/102/2025, दि.21/10/2025.

विषय: पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परिक्षा-2024 बाबत.

****

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा-2024 मधील उमेदवारांचे प्रशिक्षण सत्र क्र 130 दिनांक 17/11/2026 पासून सुरु होत असून त्याअनुषंगाने संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचे घटकातील उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे दिनांक 17/11/2026 रोजी 09.00 वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने पाठविणेबाबत तसेच हजर होण्यासाठी Joining Instruction (प्रत संलग्न) व (मुख्य) परीक्षा-2024 मधील उमेदवारांच्या निदर्शनास आणुन देणेबाबत आपल्या स्तरावरून संबंधित घटक प्रमुखांना कळविणेस विनंती आहे. तसेच महाराष्ट्र पोलीसच्या संकेतस्थळावर सदरच्या मार्गदर्शक सुचना प्रसिध्द होणेस विनंती आहे.

सदर प्रशिक्षण सत्रास पाठविण्यात येणाऱ्या उमेदवारांना विहीत दिनांक व वेळेत हजर होण्याबाबत योग्य ती समज देणेस आपले स्तरावरुन घटक प्रमुखांना सुचित करणेस विंनती आहे.

Digitally signed by
NANDKUMAR TRYAMBAK THAKUR
Date: 27-10-2026 17:35:29

(नंदकुमार ठाकूर)
सहसंचालक,
महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

पोलीस उपनिरीक्षक पदाच्या प्रशिक्षणास हजर राहणाऱ्या 130 (डीएन) बॅचच्या कॅडेट्सना मार्गदर्शक सूचना

1. पोलीस उपनिरीक्षक विभागीय मर्यादित स्पर्धा (मुख्य) परीक्षा 2024 मधील निवड करण्यात आलेले 181 व परीक्षा-2022 मधील 6 तसेच मागील सत्रात मुदतवाढ दिलेल्या 14 उमेदवार यांनी दिनांक 17/11/2026 रोजी सकाळी 09.00 वाजेपावेतो महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे सत्र सुरु होणाऱ्या सत्र क्र.130 या प्रशिक्षणासाठी हजर रहावे.
2. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार विहीत वेळेत व दिनांकास महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदासाठी हजर होण्यास स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल.

हजर होणेस मुदतवाढ बाबत

3. उमेदवार गंभीर आजारी, हजर होणेस विलंबाबत अंथरुणाला खिळून असल्याने दिनांक 17/11/2026 रोजी प्रशिक्षणास तात्पुरते हजर होऊ शकत नसल्यास, संबंधीत जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रमाणपत्रासह तसा अर्ज, उपरोक्त विहीत दिनांकापूर्वी किमान 3 दिवस आधी संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचेकडे पाठविणे आवश्यक असेल. अशा उमेदवारांना जास्तीत जास्त 15 दिवसांपर्यत उशिरा हजर होण्याबाबत परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. अशा परवानगी मिळालेल्या उमेदवारांनी सदरचा कालावधी संपताच प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्याची निवड रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. (शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र: मलोओ 1119/115/8 दि.02/08/2019)

पुढील सत्रात मुदतवाढ बाबत

4. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीएसबी-310/प्रक्र626/पोल-5अ, दिनांक 08/10/2010 अन्वये पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबतचे धोरण आहे. त्यानुसार मुदतवाढ घेणेकरीता सादर करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. **(सहपत्र)**

पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षणास मुदतवाढ मिळविणे गरजेचे असलेल्या उमेदवारांनी सदर परिपत्रकातील अटी व नियमात बसत असल्यास त्यांचा प्रशिक्षणास मुदतवाढ मिळण्याबाबतचा विहित नमुन्यातील अर्ज संचालक म.पो.अ., नाशिक यांचेकडील प्रशिक्षण सुरु होण्यास किमान 15 दिवस आधी पाठवावा. **सहपत्र 1 प्रमाणेच्या शासन परिपत्रकातील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणास मुदतवाढ देय नाही.** विहीत नमुन्यात नसलेल्या व संचालक, म.पो.अ., नाशिक यांना प्रशिक्षण सत्र सुरु होण्यापुर्वी किमान 15 दिवस अगोदर प्राप्त न होणाऱ्या मुदतवाढीच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोलीस महासंचालक/शासनास व इतर ठिकाणी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. मुदतवाढीबाबत अर्ज स्विकृत झाला किंवा नाही याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. मुदतवाढ मिळण्यासंबंधी मा. संचालक यांच्या मान्यतेचे लेखी पत्र प्राप्त झाल्याशिवाय मुदतवाढ मिळाल्याचे गृहीत धरु नये. मुदतवाढीचे पत्र पोहोचण्यातील पोष्टाच्या व इतर प्रशासकीय दिरंगाईस महाराष्ट्र पोलीस अकॅडमी जबाबदार राहणार नाही. तसेच अशी मुदतवाढ केवळ एक सत्राकरीताच देण्यात येईल.

हजर होण्यापूर्वी पूर्वतयारी-

5. प्रशिक्षणामध्ये बाहयवर्ग प्रशिक्षण, शारीरीक कवायत, धावणे, पी.टी., योगा, मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण नियमितपणे करावे लागणार आहे. त्याकरीता उमेदवारांचे शारीरीक स्वास्थ्य, सुदृढ असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशिक्षणास हजर होतांना उमेदवारांनी खालील प्रकारची वैद्यकीय चाचणी करुन त्याचा अहवाल हजर होतांना सादर करावा.

   Routine Blood Test:

   A) CBC
   B) HBA1C
   C) B.S.L (Fasting & (P.P)
   D) Lipid Porfile
   E) TFT (Thyroid Funtion Test)
   F) Vitamin-D
   G) Vitamin B-12
   H) Calcium

6. ज्या उमेदवारांना एखादया आजाराबद्दल डॉक्टरांनी औषधे घेण्याचे सुचीत केले असेल अशा उमेदवारांनी सदर आजाराबाबत संबंधीत डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शनसह औषधे / गोळया ई. सोबत बाळगाव्यात आणि मपोअ येथे हजर झाल्यास सदर बाबत वैद्यकीय अधिकारी, मपोअ, नाशिक यांना अवगत करावे.

7. **मेस व सेंट्रल** स्टोअर्स येथील खर्चाचा अग्रीम म्हणून अनुक्रमे 5000 व 10000 असे एकूण 15000/-रुपये हजर होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक आहे. अकॅडमीचे खाते **MPA NEW TRAINEES** या नावाने SBI शाखा महात्मानगर येथे असून खाते क्रमांक **42069588749** असा असून SBI बँकेच्या महात्मानगर ब्रँचचा **IFSC Code हा SBIN0021197** असा आहे. सदर खात्यावर प्रशिक्षणार्थीनी NEFT च्या माध्यमातून रुपये 15000/- ही रक्कम जमा करावी व त्याबाबतची Slip ची कॉपी (Printout) अॅकॅडमीत येतांना सोबत आणावी. तसेच Transaction ID स्वतंत्र नोंदवुन हजर होतांना आवश्यकतेनुसार सादर करावा. सदरची रक्कम ही रोख स्वरूपात स्विकारली जाणार नाही. तरी संबंधीत उमेदवार यांनी सदरची रक्कम online पध्दतीने भरणा करण्यात यावी.

8. **सर्व प्रशिक्षणार्थी यांनी** White & White **ड्रेसवर** red background असलेल्या **व दोन्ही कान पूर्ण दिसतील असे चेहरा समोर ठेवून काढलेले 10 पासपोर्ट साईज फोटो सोबत आणावेत. प्रशिक्षणार्थीना चष्मा असल्यास गॉगल ग्लासचा चष्मा न वापरता प्लेन चष्मा वापरुन फोटो काढावेत.**

9. प्रशिक्षणार्थीनी अकॅडमीमध्ये हजर होतांना पुर्ण बाहयांचा पांढरा शर्ट व पांढरी पॅन्ट (White full sleeves shirt & white trousers (प्रत्येकी 2 नग) formal काळया रंगाचा लेदर बेल्ट सोबत आणावेत.

10. **प्रशिक्षणार्थीनी सोबत आणावयाचे इतर आवश्यक साहित्य :-**

    1) **चांगल्या प्रतीचा लॅपटॉप 1 नग तसेच स्वत:चा** Email - ID **तयार करून घेवून यावा.**

    2) **रुम मध्ये उपयोगी येणारे साहित्य.**

1) ब्लँकेट	1 नग
2) चादर (सोलापुरी)	1 नग
3) सफेद शर्ट (Full sleeves)	2 नग
4) सफेद ट्राउझर	2 नग
5) सिव्हील ड्रेस	आवश्यकते प्रमाणे
6) लॉक (कुलूप)	1 नग (आवश्यक)

11. अॅकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर, केटल, टोस्टर, आदी विदयुत उपकरणे सोबत आणू नयेत. तसेच मौल्यवान/ किमती वस्तू रोख रककम स्वत: **सोबत बाळगू नयेत.**

अकादमीमध्ये हजर झालेनंतर-

12. प्रशिक्षणार्थीने अॅकॅडमीमध्ये टरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. सदरचे नियम त्यांना अकादमीमध्ये हजर झाल्यानंतर समजावून सांगण्यात येतील.
13. महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी, नाशिक येथील मेसमध्ये प्रशिक्षणार्थीना जेवणाची व्यवस्था आहे. प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत वेतन व भत्ते मिळणार आहेत. **त्यांचा मेसमध्ये होणारा खर्च त्यांच्या वेतनातून वजाती करण्यात येईल.**
14. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर संबधित उमदेवारास गृहपाल (वसतीगृह प्रभारी) हे निवासाची जागा, कॉट व मॅट्रेस उपलब्ध करून देतील.
15. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर **उमेदवारांना अॅकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधून खालील साहित्य पुरविण्यात येईल. त्यासाठीच्या वजाती संबंधितांच्या वेतनातून करण्यात येईल.**

साहित्य- (म.पो.अ., सेंट्रल स्टोअर्स येथून प्रशिक्षणार्थी यांना पुरविण्यात येणारे साहित्य)

अ.क्र.	वस्तूचे नांव	संख्या
1	म.पो.अ.कॅप बॅच	2 नग
2	म.पो.अ.शोल्डर बॅच	2 नग
3	म.पो.अ.बक्कल प्लेट	1 नग
4	लाईनयार्ड	2 नग
5	व्हीसल (प्लॅस्टीकची)	2 नग
6	वेब सिलींग (नायलॉन)	1 नग
7	वेब ॲक्लेट	1 जोड
8	वेब बेल्ट ग्रीन (नायलॉन)	1 नग
9	लेदर क्रॉस बेल्ट	1 नग
10	लेदर बेल्ट	1 नग
11	लेदर होलस्टर	1 नग
12	लेदर फ्रॉग	1 नग
13	लेदर नॉट	1 नग
14	लेदर ॲकल शूज	1 जोड
15	लेदर ऑक्सफर्ड शुज ब्राऊन	1 जोडी
16	खाकी कॉटन सॉक्स	4 जोडी
17	काळे कॉटन सॉक्स	4 जोडी
18	सफेद कॉटन सॉक्स	4 जोडी
19	खाकी वुलन सॉक्स	4 जोडी
20	वॉटर बॉटल	1 नग
21	म.पो.केन	1 नग
22	म.पो.क्रेस्ट (ब्लेझरसाठी)	1 नग
23	चेस नंबर (ॲकरेलिक)	1 नग
24	टाय पीन	1 नग
25	म.पो.टाय	1 नग

26	बेरी कॅप (विगंज)	2 नग
27	ट्रेनि टी शर्ट	6 नग
28	ट्रेनि हाफ पॅन्ट	6 नग
29	ट्रेनि ट्रॅक पॅन्ट (महिलांसाठी)	6 नग
30	लाठी (फायबर)	1 नग
31	ग्राऊड शिट	1 नग
32	उलन जर्सी	1 नग
33	पांढरे स्पोर्ट शुज	1 जोड
34	प्लास्टीक बादली (15 लिटर)	1 नग
35	प्लास्टीक मग	1 नग
36	प्लास्टीक क्लीप (चिमटा)	6 नग
37	चावी किचन	1 नग
38	नायलॉन दोरी	1 नग
39	स्विमींग ट्रॅक (पुरुषांसाठी)	1 नग
40	स्विमींग गॉगल	1 नग
41	स्विमींग कॅप	1 नग
42	स्विमींग कॉस्टयुम (महिलांसाठी)	1 नग
43	म.पो.अ.प्रिंटेड बॅग	1 नग
44	रजिष्टर	6 नग
45	इनडोअर क्लास बॅग (लॅपटॉप बॅग)	1 नग
46	पॉलीश ब्रश	2 नग
47	पॉलीश डबी	2 नग
48	रेन कोट	1 नग
49	सोड कव्हर	1 नग
50	स्टील कप	1 नग
51	नेम प्लेट	1 नग
52	शोल्डर रिबन	2 जोड
53	लेदर ऑक्सफड शुज काळे	1 जोड
54	खाकी ड्रेस	5 नग
55	कमांडो ड्रेस कॅप सह	1 नग
56	जंगल शुज	1 जोड
57	ब्ल्यु ब्लेझर (रेमंड कापड)	1 नग
58	सोअर्ड (तलवार)	1 नग
59	खाकी पी कॅप	2 नग
60	वेब बेल्ट खाकी (नायलॉन)	1 नग
61	हेअर बेल्ट	2 नग
62	बेडशीट (White)	02 नग
63	हेअर नेट	02 नग
64	उशी कव्हर	02 नग

65	**स्कॉर्प**	**1 नग**
66	**कमबंद सेट**	**1 नग**
67	**पांढरे अँकलेट**	**1 नग**
68	**पांढरे हॉण्ड ग्लोज**	**2 नग**
69	**काळया रंगाचा अॅक्सपड शुज**	**1 जोड**

16. **सेंट्रल स्टोअर व सबसिडिअरी कॅन्टीन येथील सर्व व्यवहार हे एटीएम /डेबीटकार्ड / क्रेडीट कार्ड /UPI माध्यमातून करण्यात येईल.**

17. प्रशिक्षणार्थीना महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर प्रशिक्षणादरम्यान नियमानुसार दरवर्षी रूपये 6000/- गणवेश अनुदान मंजूर करण्यात येईल.

प्रशिक्षणादरम्यान-

18. **मुदतवाढबाबत.-**

प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी आजारी पडल्यास **वैद्यकीय कारणास्तव प्रशिक्षणासाठी अनुपस्थीतीचा कालावधी 10 दिवस (20 दिवस अर्धवेतनी) पेक्षा (आंतरवर्ग अथवा वाहयवर्ग प्रशिक्षण) जास्त होत असल्यास व त्यांची** प्रकृती या कालावधीत सुधारली नाही, **तर अशा प्रशिक्षणार्थीला पुढील वर्षाच्या प्रशिक्षण सत्रामध्ये सामावुन घेण्यात येईल.** पुढील सत्रात प्रशिक्षणास हजर करुन घेतेवेळी वैद्यकीय शारिरीक पात्रता संबधितास वैद्यकीय मंडळासमोर उभे करुन तपासली जाईल आणि वैद्यकीय मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारावर प्रशिक्षणास सामावून घ्यावे किंवा नाही, हे ठरविण्यात येईल. **पुढील बॅचमध्ये प्रशिक्षणाची मुदतवाढ/परवानगी घेणाऱ्या उमेदवाराची ते ज्या सत्रात प्रशिक्षण पूर्ण करतील त्या सत्रात सेवा जेष्ठता निश्चीत करण्यात येईल व मूळ सत्राची सेवाजेष्ठता मिळणार नाही.**

19. **प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत केवळ खालील नमूद स्पर्धात्मक परीक्षांनाच बसण्यास परवानगी देण्यात येईल :-**

1. अ) महाराष्ट्र लोकसेवा आयेगामार्फत (MPSC) घेण्यात येणारी राज्य नागरी सेवा परीक्षा (Civil Services Examination)
(सध्याच्या पदांपेक्षा वरीष्ठ पदांसाठीच केवळ)

ब) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) घेण्यात येणारी केंद्रीय नागरी सेवा परीक्षा Civil Services Examination)

क) या व्यतिरीक्त इतर विभागांच्या सध्याच्या पदापेक्षा वरिष्ठ पदासाठी परीक्षा

उपरोक्त "अ" व "ब " मधील स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा देण्यासाठी नाशिक याच परीक्षा केंद्राची निवड करावी. केवळ नाशिक या परीक्षा केंद्रावरच प्रशिक्षणादम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल, परीक्षेसाठी **नाशिक केंद्र नसल्यास** मुंबई केंद्राची निवड करावे. **याव्यातिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.**

उपरोक्त " क " मधील परीक्षांकरीता वरीलप्रमाणे केंद्र निवडावे तसेच परीक्षा ही शासकीय सुटटीच्या दिवशी असेल तरच परवानगी देणेबाबत विचार करण्यात येईल. सदर परीक्षांमुळे पोलीस उपनिरीक्षक पदाचे मुलभूत प्रशिक्षणावर कोणताही परीणाम होणार नसल्यास परवानगी देण्याबाबत विचार करण्यात येईल.

20. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्यातबाबतच्या शासन निर्णय महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग कडील शासन परिपत्रक क्र.मभावा-2018/प्र.क्र.47/भाषा-2, दि.07 मे, 2018 मधील तरतूदी/ सुचना सर्व प्रशिक्षणार्थी यांना लागु राहतील.

21. **सवलती व सुटटयांबाबत-**

अॅकडमीतील (Leave policy) रजा धोरणनुसार केवळ आई-वडील/पत्नी-पती/ मुलगा-मुलगी (First blood Relatives) यांचे मृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रजा देणेबाबत विचार करण्यात येईल. इतर नातेवाईकांचे आजारपण, मृत्यू व लग्नसोहळयांकरीता रजा देण्यात येणार नाही. **तसेच ज्या उमेदवारांची खेळाडू म्हणून निवड झालेली आहे. अशा खेळाडू उमेदवारांना संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत 10 दिवसापेक्षा जास्त खेळाकरीता बाहेर जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही.**

22. **उमेदवारांनी प्रशिक्षणादरम्यान मोबाईल फोनचा वापर हा फक्त वस्तीगृहाचे आवारातच करता येईल.**

बंधपत्र व राजीनामाबाबत-

23. **प्रशिक्षणास हजर होणाऱ्या सर्व प्रशि. पोलीस उपनिरीक्षकांनी** - " प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस उपनिरीक्षक या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास/सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडून प्रशिक्षणावर झालेला खर्च आणि प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत संबंधीत उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल ही अट मी जाणून आहे व सदर अट मला मान्य व बांधील आहे " अशा आशयाचे बंधपत्र रु.500/- चे बाँड पेपरवर लिहून देणे आवश्यक आहे. सदर बंधपत्राचा नमुना (**सहपत्रे**) प्रमाणे नुसार सोबत जोडला आहे. सदर बंधपत्र प्रशिक्षणास हजर होतांना कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळेस संबंधीत तपासणीसाकडे सादर करावे. बंधपत्रावर दोन जामीनदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत. (शासन पत्र क्र. पीएसबी-0311/प्र.क्र.464/पोल-5अ दि.04/11/2011)

24. तसेच प्रशिक्षणास हजर होतांना सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार आवश्यक असणारे बंधपत्र 1 ते 5 भरुन देणे आवश्यक राहील.

25. सदर मार्गदर्शक सूचना व मार्गदर्शक सूचनांसोबतची सहपत्रे www.mahapolice.gov.in व www.mpanashik.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(टिप:- या फक्त प्रशिक्षणास हजर होतांना प्रशिक्षणार्थीकरीता मार्गदर्शक सुचना असुन सेवा शर्ती व इतर प्रशासकीय बाबी नियुक्ती आदेशाप्रमाणे असतील.

सहपत्रे:-

1.पोउपनि पदाच्या पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण घेण्यास परवानगीचा अर्ज
2.प्रशि.पोउपनि यांचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र
3.शपथपत्राचा नमुना
4.बंधपत्र 1 ते 5

(नवल बजाज)
संचालक
महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी, नाशिक

पोलीस उप निरीक्षक पदी निवड झालेल्या
उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : पीएसबी-०३१०/प्र.क्र.६२६/पोल-५अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ ऑक्टोबर २०१०

: शासन परिपत्रक :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक (महिला व पुरुष बिनहत्यारी) यांचे ५०% पदे सरळसेवा (नामनिर्देशनाने) भरतीने भरण्यात येत असून, या पदी नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे १२ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. काही उमेदवार विविध कारणांमुळे प्रशिक्षणासाठी मुदतवाढ देण्याबाबत शासन, पोलीस महासंचालक यांच्याकडे विनंती अर्ज पाठवित असतात. प्रशिक्षणास मुदतवाढ देण्यासाठी प्राप्त अर्जांवर निर्णय घेण्यासाठी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नसल्याने अशा अर्जांवर निर्णय घेताना अडचणी निर्माण होतात. हे लक्षात घेऊन प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विविध यंत्रणांकडे पाठविण्यात आलेल्या मुदतवाढीच्या विनंती अर्जांवर एकत्रित कार्यवाही करण्याच्या दृष्टीने एकसूत्रता असावी म्हणून खालीप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(अ) पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा २००७ मध्ये निवड झालेल्या व त्यापुढे पोलीस उपनिरीक्षक (पुरुष व महिला) मुख्य परीक्षेतून निवड होणाऱ्या उमेदवारांना प्रशिक्षणास पाठविण्याच्या आदेशात असे स्पष्ट नमूद करण्यात यावे की, उमेदवारांना प्रशिक्षणाच्या मुदतवाढी संदर्भात विनंती अर्ज करावयाचे झाल्यास ते केवळ संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्याकडेच पाठविण्यात यावेत. शासनाकडे अथवा पोलीस महासंचालकांकडे प्राप्त झालेले मुदतवाढीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(ब) उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीच्या आदेशात असेही नमूद करण्यात यावे की, केवळ खालील तीन कारणांमुळे प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल. इतर कारणांसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही.

(१) स्त्री उमेदवारांच्या बाबतीत त्या गरोदर असल्यास व तसे वैद्यकिय प्रमाणपत्र त्यांनी सादर केल्यास मुदतवाढीबाबत विचार करण्यात येईल.

(२) उमेदवार स्वतः आजारी असल्याबाबत व त्यास किमान एक महिना रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून रहावे लागत असल्याचे "जिल्हा शल्य चिकित्सक" यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्रासह उमेदवारांनी अर्ज केल्यास मुदतवाढीबाबत विचार करण्यात येईल.

(३) उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाला असेल तर तशा आशयाच्या पुराव्यासह प्रशिक्षणास मुदतवाढीसाठी अर्ज केल्यास, मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

२ वरील कारणास्तव प्रशिक्षणासाठी मुदतवाढ देण्याबाबतचे निर्णय संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या स्तरावर घेण्यात येतील व सदर निर्णय अंतिम राहिल. प्रशिक्षण मुदतवाढीच्या अर्जावरील निर्णय, असा अर्ज प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत संबंधित उमेदवारांस संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक कळवतील.

३ वरील तीन कारणांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव आलेल्या विनंत्या नाकारल्यास, त्याबाबत पोलीस महासंचालक, शासन अथवा मंत्री महोदयांकडे केलेले अपील विचारात घेण्यात येणार नाही.

४ सदर परिपत्रक पोलीस महासंचालक यांचे कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

(सदानंद जाधव)
शासनाचे उपसचिव, गृह विभाग.

प्रति.

(१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(३) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
(४) सर्व विभागीय पोलीस आयुक्त.
(५) सर्व पोलीस अधिक्षक.
(६) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई.
(७) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
(८) निवड नस्ती / पोल-५अ

नुकतेच काढलेले पांढऱ्या पार्श्वभुमीवरील 3.5 CM × 4.5 CM आकाराचे छायाचित्र येथे चिकटवावे.

'प्रवेश प्रपत्र (Admission Form)'

'महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी' (MPA), नाशिक.

CPTP सत्र क्र. **DYSP सत्र क्र.** **/ PSI सत्र क्र.**

"उमेदवाराने हे प्रपत्र (Form) निळ्या शाईने भरून MPA हजर होतांना सोबत आणावे. मात्र हे प्रपत्र व त्यासोबतच्या 5 वचनपत्रांवर उमेदवाराने MPA मध्ये कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या समक्ष स्वाक्षऱ्या करायच्या आहेत."

क्र.	MPSC आवेदनपत्र / निकाल- आडनाव	नाव	मधले नाव
01	ENGLISH CAPITAL- देवनागरी लिपीत-		
	आईचे फक्त नाव ENGLISH & देवनागरी-		
02	उमेदवाराने नाव / Spelling बदल राजपत्र केले आहे का? *(होय / नाही)* राजपत्र दिनांक- राजपत्राची प्रत सोबत जोडली आहे का? *(होय / नाही)* राजपत्रापूर्वीचे नाव- ENGLISH- राजपत्रानंतरचे नाव- ENGLISH-		
03	उमेदवाराचा संपर्क क्र. E mail ID- आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यास कुटुंबीयांचे नाव- नाते- संपर्क क्र. निवास पत्ता- ता. जि. पिनकोड- गावाचे पोलीस ठाणे-		
04	जन्मदिनांक - / / *(पुरावा- QR Code असलेला जन्मदाखला / SSC प्रमाणपत्रानुसार)*		
05	लिंग- *(M / F / Transgender)*	उंची - CM	रक्तगट - *Positive / Negative*
06	आधार क्र.	PAN क्र.	
07	वैवाहिक स्थिती- *(अविवाहित / विवाहित / घटस्फोटित / वैधव्य)*		
08	शरीरावरील ओळखचिन्हे-		
09	चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रे देणाऱ्या CP / SP कार्यालयांची नावे, जावक क्रमांक व दिनांक- जावक क्र. दि. / /20 जावक क्र. दि. / /20		
Asst. Director, MPA, स्वाक्षरी-		उमेदवार स्वाक्षरी-	

"उर्वरित मजकूर दुसऱ्या पानावर आहे. (PTO)".

10	**वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र देणाऱ्या रुग्णालयाचे नाव-** जिल्हा- जावक क्र. दि. / /20
11	**साक्षांकन नमुन्याचे प्रत्येक पान उमेदवाराने स्वसाक्षांकित केले आहे का?** *(होय / नाही)*
12	**वचनपत्रे क्र. 1 ते 5 ही स्वसाक्षांकित करून सादर केली आहेत का?** *(होय / नाही)*
13	**सर्व PSI करीता हमीपत्र, 500 ₹ मुद्रांक क्र.** नोंदणी दि. / /20
14	**महाराष्ट्र अधिवास (Domicile) प्रमाणपत्र क्र.** दि. / /20
15	**संगणक हाताळणी ज्ञानाचे अर्हता प्रमाणपत्र जोडले आहे का?** *(होय / नाही)* **प्रमाणपत्राचे नाव** (उदा. *MS-CIT*) - **प्रमाणपत्र क्र.** *संदर्भ- म.ना से. (संगणक हाताळणी ज्ञानाची आवश्यकता) नियम, 1999- मधील नियम 3 नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षांच्या आत उमेदवाराने प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.*
16	**उमेदवार यापूर्वी शासकीय नोकरीत असल्यास त्या विभागाचे नाव-** **कार्यालयाचे नाव-** **नोकरी रुजू-** दि. / / 20 **कार्यमुक्त / राजीनामा मंजूरी आदेश जा.क्र.** दि. / /20 **प्रत्यक्ष कार्यमुक्त-** दि. / / 20 **कार्यमुक्त वेळ-** *(मध्यान्हपूर्व / मध्यान्होत्तर)*
17	***Only for Dept. PSI निवड-*** **'किमान नियमित सेवा' पूर्ण केल्याचे विवरणपत्र-2 सोबत जोडले आहे का?** *(होय / नाही)* *(पदवीधर- 4 वर्षे, HSC / समतुल्य-5 वर्षे, SSC / समतुल्य-6 वर्षे)* **PSI निवड-मागास प्रवर्गाची 5 वर्षे वाढीव वयोमर्यादा सवलत घेतली आहे का?** *(होय / नाही)* *(Dept. PSI परीक्षेस कमाल वयोमर्यादा 35 वर्षे + 5 वाढीव वर्षे सवलत घेतली असल्यास जातीचा दाखला व जात पडताळणी, NCL प्रमाणपत्र व NCL पडताळणी बंधनकारक आहे.)* **पोलीस अंमलदार निवड आरक्षित मागास प्रवर्गातून झाली आहे का?** *(होय / नाही)* **असल्यास आरक्षित मागास प्रवर्ग कोणता?** **जात पडताळणी प्रमाणपत्र क्र.** दि. / /20 *(पोलीस अंमलदार निवड आरक्षित मागास प्रवर्गातून झालेली असल्यास जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक राहील. संबंधितांचा सेवापट MPA ला प्राप्त होताच निवड प्रवर्ग-जात पडताळणीबाबत खात्री करून उचित कार्यवाही केली जाईल.)*
18	**PSI प्रशिक्षणास यापूर्वी मुदतवाढ घेतली होती का?** *(होय / नाही)* मुदतवाढ आदेशाची प्रत सोबत जोडली आहे का? *(होय / नाही)* मुदतवाढ आदेशाचा जावक क्र. व दिनांक?
Asst. Director, MPA, स्वाक्षरी- **उमेदवार स्वाक्षरी-** *"उर्वरित मजकूर तिसऱ्या पानावर आहे. (PTO)".*	

19	**उमेदवाराची DYSP / PSI निवड झालेल्या MPSC परीक्षेचे नाव व वर्ष-** **निवड यादीतील उमेदवाराचा अनुक्रमांक-**
*MPSC Dept. PSI परीक्षेस प्रवर्गनिहाय आरक्षण लागु नाही. परंतु 35 वर्षे + 5 वर्षे ही **मागास प्रवर्ग वयोमर्यादा सवलत** घेतली असल्यास जातीचा दाखला व जात पडताळणी, NCL प्रमाणपत्र व NCL पडताळणी बंधनकारक आहे.*	
20	**A) MPSC DYSP / PSI (सरळसेवा) निवडीचा प्रवर्ग-** धर्म- जात- **B)** जात प्रमाणपत्र क्र. दि. / /20 **C)** जात वैधता प्रमाणपत्र असल्यास क्र. दि. / /20 **D)** निवड खेळाडू प्रवर्ग- उपसंचालक क्रिडा विभाग, **वैधता** प्रमाणपत्र क्र. दि. / /20 **E)** निवड अनाथ प्रवर्ग- अनाथ प्रमाणपत्र क्र. दि. / /20
21	**NCL प्रमाणपत्र पडताळणी-** *नियुक्ती (Open, EWS, SC, ST वगळून) मागास प्रवर्गातील लाभार्थी उमेदवारांना बंधनकारक आहे. संदर्भ- इतर मागास बहुजन कल्याण विभाग GR दि. 04/12/2025 मधील परिच्छेद क्र. 2 अ) नुसार.* **NCL प्रमाणपत्र जावक क्र.** **NCL वर्ष-** 20 - 20 **NCL जारी-** दि. / /20 **NCL पात्रता काळ-** दि. 31 /03/20 पर्यंत.
22	**MPSC मुख्य परीक्षा अर्जाची प्रत** प्रत्येक पान स्वसाक्षांकित करून सादर केली आहे का?
23	MPSC द्वारे निवडीस आवश्यक ठरलेल्या **शैक्षणिक अर्हता प्रमाणत्रांच्या प्रती** स्वसाक्षांकित करून या प्रपत्रासोबत दिलेल्या 'कागदपत्रांच्या यादी' प्रमाणे चढत्या क्रमाने जोडल्या आहेत का? *(होय / नाही)* **SSC प्रमाणपत्र क्र.** दि. / / **HSC प्रमाणपत्र क्र.** दि. / / **पदविका-** प्रमाणपत्र क्र. दि. / / **पदवी-** प्रमाणपत्र क्र. दि. / / **पदव्युत्तर पदवी-** प्रमाणपत्र क्र. दि. / /
24	**आज रोजी MPA हजर होण्यापूर्वी स्पर्धा परीक्षांना आवेदन पत्र सादर केलेले असल्यास त्या परीक्षांची नावे व वर्ष-** *(ही माहीती सादर न केल्यास त्या परीक्षेला / पदावर हजर होण्यास उमेदवाराला बाधा होउ शकते? याची जाणीव उमेदवाराने ठेवावी.)*
25	**सहाय्यक संचालक (Asst. Director) MPA यांचा अभिप्राय-** उमेदवार पात्र असल्याने त्यास दि. / /20 रोजी वा. MPA मध्ये हजर करून घेतले आहे.
Asst. Director, MPA, **दि. / /20** **उमेदवार** स्वाक्षरी- स्वाक्षरी- नाव - उमेदवाराचे नाव-	

'प्रवेश प्रपत्रासोबत क्रमवार सादर करावयाची कागदपत्रे (Documents)'

MPA मध्ये हजर होणाऱ्या DYSP / सरळसेवा PSI / Dept. PSI उमेदवाराने त्यास लागु असतील त्या कागदपत्रांच्या (दस्तऐवजांच्या) छायाप्रती (Photocopies) निळ्या शाईने स्वसाक्षांकित (Self Attested) करून खालील क्रमात दोरीने (File Tag / Lace) बांधाव्यात. ***(स्टॅपलर पिनने बांधू नयेत)***

(MPA प्रवेशावेळी 'प्रपत्र' व 'कागदपत्रांचा संच' हे वेगवेगळ्या स्वरूपात MPA प्रशासनास सादर करावे)

01) चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, मुळ प्रत. *(जिल्हा SP / CP कार्यालयामार्फत MPA ला प्राप्त झालेले)*

02) वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र, मुळ प्रत. *(जिल्हा SP / CP कार्यालयामार्फत MPA ला प्राप्त झालेले)*

03) साक्षांकन नमुना मुळ प्रत, प्रत्येक पान स्वसाक्षांकित असावे. (अधिकारी यांनी)

04) वचनपत्रे (Undertakings) क्र. 1 ते 5.

05) नोंदणीकृत क्षतिपूर्ती हमीपत्र- 500 ₹ च्या गैर-न्यायिक मुद्रांकावरील. ***(Only For All PSI)***

06) नाव बदल केल्याचे राजपत्र. *(उमेदवाराने नावात / Spelling मध्ये बदल केला असल्यास)*

07) जन्मदिनांक पुरावा- *(QR Code असलेला जन्मदाखला / SSC प्रमाणपत्र-जन्मदिनांक नमुद असलेले)*

08) महाराष्ट्र अधिवास (Domicile) प्रमाणपत्र.

09) संगणक अर्हता प्रमाणपत्र. *(संदर्भ- महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी ज्ञानाची आवश्यकता) नियम-1999.)*

10) कार्यमुक्त / राजीनामा मंजूरी आदेश मूळ प्रत. *(उमेदवार यापूर्वी शासकीय नोकरीत असल्यास)*

11) पोलीस अंमलदार विहीत सेवा काळ प्रमाणपत्र. ***(Only for Dept. PSI)***

12) PSI प्रशिक्षण मुदतवाढ आदेशाची प्रत. *(यापूर्वी PSI च्या MPA प्रशिक्षणास मुदतवाढ घेतली असल्यास).*

13) जात प्रमाणपत्र. *(निवड आरक्षित मागास प्रवर्ग / Dept. PSI 5 वर्षे वयोमर्यादा सवलत लाभार्थी असल्यास)*

14) जात वैधता प्रमाणपत्र. *(निवड आरक्षित मागास प्रवर्ग / Dept. PSI वयोमर्यादा सवलत लाभार्थी असल्यास)*

15) उपसंचालक क्रिडा विभाग वैधता प्रमाणपत्र- *निवड खेळाडू प्रवर्गातून असल्यास.* ***(Not for Dept. PSI)***

16) अनाथ प्रमाणपत्र- *निवड अनाथ प्रवर्ग लाभार्थी असल्यास.* ***(Not for Dept. PSI)***

17) NCL प्रमाणपत्र- *निवड आरक्षित मागास प्रवर्ग (Open, EWS, SC, ST वगळून) / Dept. PSI 5 वर्षे वयोमर्यादा सवलत लाभार्थी असल्यास. (टीप- नोकरीत रुजू होताच NCL प्रमाणपत्र पडताळणी बंधनकारक राहील).*

18) MPSC मुख्य परीक्षा आवेदन पत्राची प्रत- *प्रत्येक पान स्वसाक्षांकित केलेले असावे.*

19) SSC प्रमाणपत्र- *(जन्मदिनांक नमुद असलेले).* **20) HSC प्रमाणपत्र,**

21) पदविका प्रमाणपत्र, **22) पदवी प्रमाणपत्र,** **23) पदव्युतर पदवी प्रमाणपत्र,**

24) आधार क्रमांक प्रत, **25) पॅन (PAN) क्रमांक प्रत,**

इत्यादी आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती दोरीने (File Tag / Lace) क्रमवार बांधाव्यात.

'वचनपत्र (Undertaking) क्र. 1 / 5.'

(प्रशिक्षणार्थ्यांचे आचरण व शिस्त पालनाविषयी)

"मी, श्री. / श्रीमती-

पद- परिविक्षाधीन DYSP / प्रशिक्षणार्थी PSI या वचनपत्राद्वारे मान्य करतो / करते की,

1) MPA, नाशिक, येथील मुलभुत प्रशिक्षणास नियुक्तीने हजर झालो / झाले आहे. या प्रशिक्षणात धावने, उंचावर चढणे, अडथळे पार करणे, शस्त्र व स्फोटक हाताळणी, अवैध जमाव पांगवने, रात्रगस्त, जंगल कॅम्प, दहशतवादी विरोधी कारवाई, इत्यादी साहसी विषयांचा समावेश असल्याची मला जाणीव असून या प्रशिक्षणास मी स्वेच्छेने तयार आहे. त्यामुळे हे प्रशिक्षण घेत असतांना मला काही दुखापत झाल्यास मी त्यास MPA प्रशासनाला जबाबदार धरणार नाही. तसेच माझ्या माहीतीप्रमाणे मला अद्याप कोणताही आजार नसून माझा कोणताही आजार मी MPA प्रशासनापासून लपवलेला नाही. हे प्रशिक्षण पूर्ण करण्यास मी सक्षम असल्याचा मला विश्वास आहे.

2) मी MPA मध्ये प्रशिक्षणास असतांना मला देय असलेली वेतनश्रेणी व पदाचा दर्जा यांपेक्षा उच्च वेतनश्रेणी व उच्च पदाचा दर्जा असलेल्या स्पर्धा परिक्षांनाच मी MPA च्या लेखी परवानगीने हजर राहु शकतो याची मला जाणीव असून अशा स्पर्धा परिक्षांना MPA, नाशिकला सर्वात जवळ असलेले परीक्षा केंद्र मी निवडेल.

3) MPA च्या रजा धोरणानुसार मुलभूत प्रशिक्षण काळात प्रशिक्षणार्थ्यास रजा दिली जात नसून माता-पिता, भाऊ-बहीण, पती-पत्नी, मुलगा-मुलगी (First blood relatives) यांचा मृत्यू / गंभीर आजारपणासाठीच अगदी किमान रजा देण्याचा विचार केला जात असल्याने स्पर्धा परीक्षा, साखरपुडा, विवाह, कौटुंबिक, धार्मिक कार्यक्रम इत्यादींसाठी मला सुटी / रजा मिळण्यास व्यत्यय होउ शकतो याची मला जाणीव आहे. हे विचारात घेउनच मी माझ्या कार्यक्रमांचे नियोजन करेल. तसेच खेळाडू उमेदवारांना संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत 10 दिवसांपेक्षा जास्त काळ खेळाकरीता MPA बाहेर जाण्याची परवानगी दिली जात नाही याचीही मला जाणीव आहे.

4) MPA प्रशासन व प्रशिक्षणार्थी सहकारी यांच्याशी मी सौजन्याने वागेन. MPA मधील पुरूष प्रशिक्षणार्थ्यांना महीला वसतिगृह परिसरात तर महीला प्रशिक्षणार्थ्यांना पुरूष वसतिगृह परिसरात मनाई असल्याची तसेच प्रशिक्षणास हजर असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना धुम्रपान, मद्यपान, मादक द्रव्ये व अंमली पदार्थांचे सेवन करण्यास मनाई असल्याचीही मला जाणीव आहे. MPA मधील अशा सर्व प्रकारच्या शिस्तीचे मी काटेकोरपणे पालन करील.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम यांतील तरतुदी माझ्या पदाला म्हणजे मला लागु झाल्याने **शिस्तभंग कारवाईद्वारे मला किरकोळ (Minor) शिक्षा किंवा सेवेतुन कादुन टाकणे (Removal), बडतर्फ (Dismissal) अशा जबर (Major) शिक्षा होउ शकतात याची मला जाणीव आहे."**

समक्ष **दि. / /20** **उमेदवाराची स्वाक्षरी-**

स्वाक्षरी-

नाव-

सहाय्यक संचालक, MPA.

'वचनपत्र (Undertaking) क्र. 2 / 5.'

(महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम-1951 इत्यादींबाबत)

"मी, श्री. / श्रीमती-

पद- परिविक्षाधीन DYSP / प्रशिक्षणार्थी PSI या वचनपत्राद्वारे मान्य करतो / करते की,

1) पोलीस उपनिरीक्षक (सेवा प्रवेश) नियम-1995 (सुधारणांसह), महाराष्ट्र नागरी सेवा नियम, शासन निर्णय, महाराष्ट्र पोलीस नियमावली- 2024 नुसार माझी नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरूपात असून **विहीत काळात मुलभुत प्रशिक्षण पूर्ण करणे, विहीत संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होउन 2 वर्षांचा परिविक्षाधीन काळ पूर्ण करणे** हे मला बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.
2) **प्रथम नियुक्तीच्या पदावर 3 वर्षांची नियमित सेवा पूर्ण केल्यावर** व विहीत शर्तींची पूर्तता केल्यावरच अस्थायी कर्मचारी **स्थायित्व प्रमाणपत्र** मिळण्यास पात्र होतात. यासंबंधीच्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. स्थाप्रप- 1414/ (प्र.क्र.73/14) /13-अ, मुंबई, दि. 11/09/2014 व परिपत्रक क्र. स्थाप्रप- 1415/ (प्र.क्र.14/15) /13-अ, दि. 19/09/2017 ची मला जाणीव आहे.
3) **साक्षांकन नमुना (Attestation Form) भरण्यासंबंधीचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. 28/10/2017 मधील परिच्छेद क्र. 4 मी वाचला** असून याच शासन निर्णयानुसार मी माझा साक्षांकन नमुना शासनास सादर केला आहे. **सेवा प्रवेश प्रसंगी स्वत:च्या चारित्र्याविषयी जाणीवपूर्वक खोटी माहीती देणाऱ्या / सत्य जाणीवपूर्वक लपवणाऱ्या उमेदवारावर गुन्हा दाखल होऊ शकतो, शिस्तभंग कारवाईद्वारे उमेदवारास सेवेतुन काढुन टाकणे (Removal) / बडतर्फ (Dismissal) अशी जबर (Major) शिक्षा होउ शकते याची मला जाणीव आहे.**
4) महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, परिपत्रक क्र. मभावा-2018/ प्र.क्र. 47/ भाषा-2 दि. 07/05/2018 मधील **महाराष्ट्राच्या शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सर्वत्र वापर (वर्जित प्रयोजने वगळता)** करण्याबाबतच्या सूचनांची मला जाणीव आहे."

समक्ष **दि. / /20** **उमेदवाराची स्वाक्षरी-**

स्वाक्षरी-

नाव-

सहाय्यक संचालक, MPA.

'वचनपत्र (Undertaking) क्र. 3 / 5.'

(सेवापुस्तकात जन्मदिनांक नोंदविण्यास हमीपत्र व स्वग्राम नोंदविण्यास घोषणापत्र)

"मी, श्री. / श्रीमती-

पद- परिविक्षाधीन DYSP / प्रशिक्षणार्थी PSI या वचनपत्राद्वारे मान्य करतो / करते की,

1) माझी जन्मदिनांक / / (अक्षरी-)

अशी असुन त्याच्या पुराव्याकामी मी QR Code असलेला जन्मदाखला / जन्मदिनांक नमूद असलेले SSC उत्तीर्ण प्रमाणपत्र स्व-साक्षांकीत करून जोडले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-1981 मधील नियम क्र. 38 (2) मधील टिप- *शासकीय सेवेत व्यक्तीची नियुक्ती होण्याच्या वेळी, तिच्या सेवापुस्तकात जन्मदिनांकाची नोंद घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्याकडून* ***हमीपत्र घेण्यात येईल. सदर हमीपत्र, कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकामध्ये व वैयक्तिक नस्तीमध्ये ठेवण्यात येईल****. सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर जन्मदिनांकाची नोंद घेतल्यानंतर, शासकीय कर्मचाऱ्याची सही, या रकान्यात दिनांकासह त्याची स्वाक्षरी घेण्यात येईल. "*

(बी) *जेव्हा सेवापुस्तकात जन्मदिनांकाची नोंद केली असेल तेव्हा, संबंधित व्यक्तीव्यतिरीक्त दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने काळजी न घेतल्यामुळे किंवा उघड उघड लेखनदोष म्हणुन तशी नोंद झाली होती, असे माहीत झाल्याशिवाय त्या नोंदीत कोणताही फेरबदल केला जाणार नाही :*

परंतु, खंड (बी) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आकस्मिक प्रसंगासाठी शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या 01 वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

या नियमाची मला जाणीव आहे."

2) संसंद, विधीमंडळ व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवेळी आदर्श आचारसंहिता लागू होत असल्याने PSI पासून वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यांच्या सेवापुस्तकात स्वग्राम नोंदलेल्या जिल्ह्यात कार्यकारी पदावर / कार्यकारी घटकांत नेमणुक राहण्यास मर्यादा येते. परिणामी अशा अधिकाऱ्यांची अकार्यकारी पदावर किंवा संबंधित जिल्ह्याबाहेर बदली होते याची मला जाणीव आहे.

सेवापुस्तकात स्वग्राम नोंदवण्यासाठी माझा कायमचा पत्ता मी पुढीलप्रमाणे घोषित (Declare) करत आहे."

पत्ता-

भूमिचिन्ह- **गट क्र. / सर्व्हे क्र.** **ग्राम-**

तालुका- **जिल्हा-** **पिन कोड-**

समक्ष **दि.** / /20 **उमेदवाराची स्वाक्षरी-**

स्वाक्षरी-

नाव-

सहाय्यक संचालक, MPA.

'वचनपत्र (Undertaking) क्र. 4 / 5.'

(जात वैधता प्रमाणपत्र, NCL पात्रता प्रमाणपत्र, संगणक हाताळणी ज्ञान प्रमाणपत्र)

1) ***जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी-*** *नियुक्ती ही (Open, EWS वगळता) SEBC, OBC, SBC, SC, ST, DT-A, NT-B, NT-C, NT-D आरक्षित प्रवर्गातील लाभार्थी असणाऱ्या उमेदवारांस बंधनकारक आहे.*
(संदर्भ- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि. 05/11/2009 मधील दि. 12/12/2011 नुसारच्या सुधारणा)
2) ***NCL प्रमाणपत्र पात्रता पडताळणी-*** *(Open, EWS, SC, ST यांना NCL प्रमाणपत्र नसते). हे प्रवर्ग वगळता नियुक्ती SEBC, OBC, SBC, DT-A, NT-B, NT-C, NT-D आरक्षित प्रवर्गातील लाभार्थी असणाऱ्या उमेदवारांना NCL पात्रता पडताळणी बंधनकारक आहे. (संदर्भ- इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय, दि. 04/12/2025 मधील परिच्छेद क्र. 2 अ नुसार.)*
3) ***म.ना से. (संगणक हाताळणी ज्ञानाची आवश्यकता) नियम, 1999-*** *नियम क्र. 3.*

"मी, श्री. / श्रीमती-

पद- परिविक्षाधीन DYSP / प्रशिक्षणार्थी PSI या वचनपत्राद्वारे मान्य करतो / करते की, MPSC द्वारे

1) माझी निवड ही . . . . . या प्रवर्गातून झाली असल्याने मला जात पडताळणी लागु . . . . (आहे / नाही)

2) माझी निवड ही . . . . . या प्रवर्गातून झाली असल्याने मला NCL पडताळणी लागु . . . (आहे / नाही)

3) Dept. PSI निवडीत मी मागास प्रवर्गाच्या 5 वर्षे वाढीव वयोमर्यादेचा लाभ घेतला . . . . (आहे / नाही)
(Dept. PSI निवडीत ही वयोमर्यादा सवलत घेतल्यास जात पडताळणी व NCL पडताळणी बंधनकारक आहे.)

4) मी संगणक हाताळणी ज्ञानाचे प्रमाणपत्र सादर केलेले . . . . . (आहे / नाही)

उमेदवाराची निवड ही SEBC, OBC, SBC, SC, ST, DT-A, NT-B, NT-C, NT-D या मागास आरक्षित प्रवर्गातून झाली असल्यास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 06 महीण्यांच्या आत उमेदवाराने **'जात वैधता प्रमाणपत्र'** आपल्या नियुक्ती कार्यालयास सादर करणे तसेच उमेदवाराची निवड ही SEBC, OBC, SBC, DT-A, NT-B, NT-C, NT-D या मागास आरक्षित प्रवर्गातून झाली असल्यास **'उन्नत व प्रगत वर्गात मोडत नसल्याबाबतचे (NCL) पात्र प्रमाणपत्र'** आपल्या नियुक्ती कार्यालयास 06 महीण्यांच्या आत सादर करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे.

मी नोकरीवर रुजू होताच मला लागु असेल त्याप्रमाणे मी तात्काळ माझे जात प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी (Scrutiny) समितीस तर NCL प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास विहित मार्गाने पडताळणीस सादर करून त्याची पोचपावती माझ्या नियुक्ती कार्यालयास तात्काळ सादर करेल. उमेदवाराचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरवल्यास / उमेदवाराची NCL प्रमाणपत्र पडताळणी जिल्हाधिकारी कार्यालयाने अपात्र ठरवल्यास उमेदवार संबंधित नोकरीचा हक्क गमावतो याची मला जाणीव आहे.

म.ना से. (संगणक हाताळणी ज्ञानाची आवश्यकता) नियम, 1999- नियम क्र. 3 नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून **2 वर्षांच्या आत उमेदवाराने संगणक हाताळणी ज्ञानाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक** असल्याचीही मला जाणीव आहे. "

समक्ष **दि. / /20** **उमेदवाराची स्वाक्षरी-**

स्वाक्षरी-

नाव-

सहाय्यक संचालक, MPA.

'वचनपत्र (Undertaking) क्र. 5 / 5.'

(महाराष्ट्र नागरी सेवा नियम अंतर्गत (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम-2005 मधील नियम क्र. 4, नमुना 'अ' प्रतिज्ञापत्र) संदर्भ – महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. 28/03/2005.

'लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन'

"मी, श्री. श्रीमती . . . . . वय- वर्षे,

श्री. . . . . यांचा मुलगा / यांची मुलगी / यांची पत्नी,

निवास पत्ता- . . . . . .

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(1) मी महाराष्ट्र शासनात परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक (DYSP) / प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक (PSI) या पदावर महाराष्ट्र पोलीस दलात रुजू झालो आहे.

(2) आज दि. / / 20 रोजी मला . . इतकी अपत्ये हयात आहेत.

त्यापैकी दि. 28/03/2005 नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या . . इतकी आहे.

(अशी अपत्ये असल्यास त्यांचा जन्मदिनांक नमुद करावा)

अपत्य क्र. 1) जन्मदिनांक- / / 20 , **अपत्य क्र. 2)** जन्मदिनांक- / / 20 ,

अपत्य क्र. 3) जन्मदिनांक- / / 20 , **अपत्य क्र. 4)** जन्मदिनांक- / / 20 ,

(3) हयात असलेल्या अपत्यांची संख्या 02 (दोन) पेक्षा अधिक असल्यास दि. 28/03/2005 नंतर जन्माला आलेल्या अपत्यांमुळे मी या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे."

समक्ष **दि. / /20** **उमेदवाराची स्वाक्षरी-**

स्वाक्षरी-

नाव-

सहाय्यक संचालक, MPA.

'हमीपत्र' (Indemnity Bond)

(Only For All PSI & Not for DYSP)

(संदर्भ- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र. PSB-0311/प्र.क्र. 464 / पोल-5अ, दि. 04/11/2011 नुसार.)

महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी (MPA), नाशिक येथे मुलभूत प्रशिक्षणासाठी हजर होतांना **सरळसेवा व विभागीय PSI उमेदवारांनी** हे 'नोंदणीकृत क्षतिपूर्ती हमीपत्र' (Indemnity Bond) 500 ₹ च्या गैरन्यायिक मुद्रांकावर (Bond) लिहून देणे बंधनकारक आहे.

(महाराष्ट्र मुद्रांक कायदा, 1958- कलम 3, अनुसूची-1, नुसार प्रशासकीय कामाच्या हमीपत्रासाठी 500 ₹ चा गैरन्यायिक (Non-judicial) मुद्रांक आवश्यक आहे)

'नोंदणीकृत क्षतिपूर्ती हमीपत्र' (Registered Indemnity Bond)

"हे हमीपत्र दिनांक- / /20 वार- . . . . . रोजी **उमेदवाराचे पूर्ण नाव-** श्री. / श्रीमती- . . . . . **पिता / पती नाव-** श्री. . . . . , **उमेदवाराची जन्मदिनांक-** / / , **उमेदवाराचा आधार क्र.** . . . . . , **उमेदवाराचा PAN क्र.** . . . . . , **उमेदवाराचा संपर्क क्र.** . . . . . , **कायमचा पत्ता-** . . . . . , **गट क्र. / सर्व्हे क्र.** . . **भूमीचिन्ह-** . . . . . , **गाव-** . . . . . , **ता.-** . . . . . , **जि.-** . . . . . , **राज्य-** . . . . . , **पिन कोड-** . . . . . , यांच्याद्वारे गृह विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या नावे लिहून दिले जात आहे. गृह विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे प्रतिनिधित्व सह संचालक (Joint Director), कार्यालय- महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी (MPA), नाशिक (उमेदवाराची नियुक्ती करणारे प्राधिकरण) आणि विशेष पोलीस महानिरीक्षक (Spl IGP), आस्थापना, कार्यालय- महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, कुलाबा, मुंबई (संवर्ग नियंत्रण प्राधिकरण) हे करत आहेत.

याद्वारे मी गृह विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या नावे एक अपरिवर्तनीय हमीपत्र (Irrevocable Bond) सादर करत असून स्वतःला खालील अटींनुसार अपरिवर्तनीयरीत्या (Irrevocably) बांधील ठेवत आहे.

1) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) . . . . . **या सरळसेवा / विभागीय परीक्षेद्वारे माझी 'पोलीस उपनिरीक्षक (PSI)' या पदावर निवड** झाल्याने मी दिनांक- / /20 रोजी महाराष्ट्र पोलीस दलात PSI या पदावर रुजू होत आहे.

2) मी हे मान्य करतो / करते की, महाराष्ट्र पोलीस दलातील माझ्या 2 वर्षांच्या मुलभूत प्रशिक्षण व परिविक्षा कालावधीत आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतरच्या 3 वर्षांच्या कालावधीत, जर मी पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदाचा राजीनामा दिला किंवा शासनास योग्य किंवा स्वीकार्य वाटणाऱ्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव सेवेतून मला मुक्त करण्याची विनंती केली, तर माझ्या प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च तसेच माझ्या सेवा कालावधीत मला दिलेले वेतन आणि भत्ते यांची परतफेड करण्यास मी जबाबदार असेन.

मी या नोंदणीकृत हमीपत्रातील (Registered Indemnity Bond) मजकुराचा अर्थ समजून घेऊन हे हमीपत्र (Bond) निष्पादीत (Executed) केले आहे आणि मी गंभीरपणे (Solemnly) असे जाहीर करतो की, मी निष्पादीत (Executed) केलेल्या या हमीपत्राचे (Bond) मी पालन करेन (Abide by)."

स्वाक्षरी

(हमीपत्र सादर करणाऱ्या उमेदवाराचे पूर्ण नाव)

या हमीपत्राचे धारक (Bondee) श्री. / श्रीमती- . . . . . यांनी त्यांची वचनबद्धता (Commitment) पाळली नाही, तर त्यांच्या वतीने सरकारला देय (Payable) असलेली भरपाई (Reimburse) मी स्वत: अदा करेन.

जामीनदार (Guarantor) क्र. 1.		**जामीनदार (Guarantor) क्र. 2.**	
स्वाक्षरी -		स्वाक्षरी-	
पूर्ण नाव-		पूर्ण नाव-	
वय- वर्षे,		वय- वर्षे,	
आधार क्र.	PAN क्र.	आधार क्र.	PAN क्र.
संपर्क क्र.		संपर्क क्र.	
पूर्ण पत्ता-		पूर्ण पत्ता-	
भूमिचिन्ह-	गाव-	भूमिचिन्ह-	गाव-
ता.-	जि.-	ता.-	जि.-
राज्य-	पिन कोड-	राज्य-	पिन कोड-

'PSI मुलभूत प्रशिक्षण मुदतवाढीस विनंती पत्र.'

(संदर्भ- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्र. PSB-0310/ प्र.क्र. 626 / पोल- 5अ, दि. 08/10/2019 ***विषय-*** *PSI पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे.)*

प्रति,

दि. / /20

संचालक,

महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी (MPA),
त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक (शहर). पिन 422 007.
ई-मेल ID- director.mpa.nashik@mahapolice.gov.in

विषय- MPA मधील माझ्या PSI (निशस्त्र) मुलभूत प्रशिक्षणास मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती करणे.

संदर्भ- 1) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्र. PSB-0310/ प्र.क्र. 626 / पोल- 5 अ, दि. 08/10/2010 नुसार PSI पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या MPA मधील मुलभूत प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत तरतूद आहे.

संदर्भ- 2) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र दुय्यम सेवा (अराजपत्रित गट-ब) PSI (निशस्त्र) मुख्य परीक्षा -सन 20... चा अंतिम निकाल-शिफारस यादी प्रकाशित दि. / /20 मधील अनुक्रमांक . . . . . नुसार माझी PSI (निशस्त्र) पदावर झालेली निवड.

उपरोक्त संदर्भ क्र. 2 नुसार PSI पदाच्या अंतिम निकाल-शिफारस यादीत अ.क्र. . . नुसार माझे नाव- . . . . . असे नमूद आहे. या पदाचे मुलभूत प्रशिक्षण PSI सत्र क्र. . . हे महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी (MPA), नाशिक येथे दि. / /20 पासून सुरू होत असून त्या प्रशिक्षणास मी हजर राहण्याबाबत मला MPA प्रशासनाद्वारे कळवण्यात आले आहे.

खालील कारणास्तव मला पुढील सत्रात मुलभूत प्रशिक्षण घेण्याची परवानगी मिळण्यास विनंती आहे.

(उमेदवाराने त्याला लागु असेल ते कारण निवडावे नको असेल ते खोडावे)

1) मी सध्या गरोदर असून माझ्या प्रसूतीचा संभाव्य दि. / / 20 असा असून संभाव्य दिनांक दर्शवणारे जिल्हा शल्यचिकित्सक, जि. . . . . यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र मी या विनंती पत्रासोबत सादर केले आहे.

2) (A) मी . . . . . या कारणास्तव दि. / /20 पासून दि. / /20 पर्यंत . . . . . या रुग्णालयात आंतररुग्ण आहे.

(B) यानंतरही मला किमान एक महीना म्हणजे दि. / /20 पर्यंत रुग्णालयात आंतररुग्ण रहावे लागणार असल्याबाबत मला वैद्यकिय अधिकाऱ्यांनी प्रमाणित केले आहे. या बाबत जिल्हा शल्यचिकित्सक, जि. . . . . यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र मी या विनंती पत्रासोबत सादर केले आहे.

3) मी MPSC / UPSC द्वारा आयोजित . . . . . या पदाच्या . . . . . या मुख्य परीक्षेस पात्र झालो असून या मुख्य परीक्षेची तयारी करणे मला आवश्यक आहे.

या स्पर्धा परीक्षेत मी सहभागी झाल्याचा पुरावा म्हणून मी या स्पर्धा परीक्षेसाठी सादर केलेल्या आवेदन पत्राची प्रत, मुख्य परीक्षेस पात्र ठरल्याबाबतच्या निकालाची प्रत, मुख्य परीक्षेचे प्रवेशपत्र यांच्या छायाप्रती (Photocopies) स्वसाक्षांकीत करून या विनंती पत्रासोबत सादर केल्या आहेत.

(टीप- यापूर्वीही PSI परीक्षेस मुदतवाढ घेतलेली असल्यास त्या मुदतवाढ मंजुरी आदेशाचा संदर्भ नमूद करून त्याची छायाप्रत (Photocopy) स्वसाक्षांकित करून या विनंती पत्रासोबत जोडावी.)

प्रशिक्षणास मुदतवाढ देण्यासंबंधीच्या संदर्भांकीत क्र. 1) मधील दि. 08/10/2010 रोजीच्या परिपत्रकाचे मी सविस्तर वाचन केले आहे. मी मुदतवाढ मागितली म्हणजे मला मुदतवाढ मिळालीच आहे असे नाही तसेच मुदतवाढ घेतल्याने मी पुढील ज्या सत्रात प्रशिक्षण पूर्ण करेल त्याच सत्राची सेवाज्येष्ठता मला देय राहील याची मला जाणीव आहे.

तरी मला या प्रशिक्षण सत्रानंतर लगतच्या प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण घेण्यास परवानगी देण्यास विनंती आहे.

सविनय सादर

स्वाक्षरी-

उमेदवाराचे नाव- ( )

दि. / /20

संपर्क क्र.

ई-मेल ID-

निवास व पत्रव्यवहाराचा पत्ता-

---------- समाप्त ----------